# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला

मुख्य कार्यालय : महाबीज भवन, कृषि नगर, अमरावती रोड, अकोला-४४४१०४

दूरध्वनी क्र. (०७२४) २४५५०९३, ७५८८६०७६१२ ई-मेल: hoadmin@mahabeej.com वेबसाईट: www.mahabeej.com


## विविध संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात सन२०१८

महामंडळाच्या आस्थापनेवरील गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील खालील रिक्त पदांची सरळसेवेने भरती करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेले उमेदवार अर्ज करू शकतील.

| अ. क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग निहाय राखीव रिक्त पदांची संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| ०१ | जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| | महिला ३० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०३ |
| | विकलांग | एकूण — १ पद श्रवणशक्तीतील दोष | | | | | | | | | |
| ०२ | कनिष्ठ केंद्र अभियंता | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०४ |
| | महिला ३० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०३ |
| ०३ | लेखापाल/अंतर्गत अंकेक्षक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०४ | व्यवस्थापकीय संचालक यांचे स्विय सहायक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०५ | कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| | महिला ३० टक्के | | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ०६ | कनिष्ठ अभियंता(विद्युत) | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०७ | लघुलेखक(निम्न श्रेणी) इंग्रजी | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| | महिला ३० टक्के | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ०८ | लघुलेखक(निम्न श्रेणी) मराठी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०९ | कनिष्ठ पैदासकार | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| | महिला ३० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| १० | सहायक क्षेत्र अधिकारी | ०२ | ०३ | ०३ | ०१ | ०२ | ०१ | ०० | १२ | ३० | ५४ |
| | महिला ३० टक्के | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०९ | १६ |
| | खेळाडू ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ |
| | अनाथ मुले १ टक्का | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०८ | १९ | ३५ |
| | विकलांग | एकूण — २ पदे (क्षीण दृष्टी — १ व चलनवलन विषयक विकलांगता - १) | | | | | | | | | |
| ११ | आरेखक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| १२ | माळी | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |

| अ. क्र. | पदाचे नाव | प्रवर्गनिहाय राखीव रिक्त पदांची संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ. जाती | अ. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुले | एकूण |
| १३ | लिपीक-टंकलेखक | ०३ | ०४ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०७ | ०९ | २५ |
| | महिला ३० टक्के | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०३ | ०७ |
| | माजी सैनिक १५ टक्के | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०३ |
| | पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन १० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ |
| | खेळाडू ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | | ०१ |
| | भूकंपग्रस्त २ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०२ | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०२ | ०३ | ११ |
| १४ | प्रयोगशाळा सहायक | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| १५ | कनिष्ठ लिपीक-टंकलेखक | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०५ |
| | महिला ३० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | माजी सैनिक १५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन १० टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | खेळाडू ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | भूकंपग्रस्त २ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०३ |
| १६ | कनिष्ठ प्रक्रिया सहायक | ०५ | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०८ | १८ | ३४ |
| | महिला ३० टक्के | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०५ | १० |
| | माजी सैनिक १५ टक्के | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०३ | ०५ |
| | खेळाडू ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ |
| | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ |
| | भूकंपग्रस्त २ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०७ | १४ |
| | विकलांग | एकूण — १ पद श्रवणशक्तीतील दोष | | | | | | | | | |
| १७ | कनिष्ठ ऑपरेटर | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०५ | १२ |
| | महिला ३० टक्के | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०४ |
| | माजी सैनिक १५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०२ |
| | खेळाडू ५ टक्के | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | भूकंपग्रस्त २ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०४ |
| १८ | शिपाई/पहारेकरी | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ११ | २० |
| | महिला ३० टक्के | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०३ | ०६ |
| | माजी सैनिक १५ टक्के | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०३ |
| | खेळाडू ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | भुकंपग्रस्त २ टक्के | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | | ०० |
| | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त | ०० | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०४ | ०९ |
| | **एकूण भरावयाची पदे** | **१९** | **१७** | **०६** | **०३** | **०५** | **०३** | **००** | **३१** | **८७** | **१७१** |

***टिप:- उपरोक्त पदसंख्येत बदल(कमी/जास्त) होण्याची तसेच त्यानुसार समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.**

**१) सूचना:-**

१.१ अर्जदार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

१.२ जाहिरातीत दिलेल्या रिक्त पदांची संख्या ही ३१ मार्च , २०१९ पर्यंत रिक्त होणारी पदे विचारात घेवून निश्चीत करण्यात आलेली असल्यामुळे, पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार निवड प्राप्त उमेदवारांना नियुक्ती व पदस्थापना देण्यात येईल. पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते ; त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदांमध्ये बदल होवू शकतो. निवड झालेल्या उमदेवारांना महाराष्ट्र राज्य तसेच बाहेरील राज्यात कोणत्याही ठिकाणी नेमणूक देण्यात येईल.

१.३ जाहिराती नुसार अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक १ ०.०५.२०१८ रोजी संबंधीत पदासाठीची किमान शैक्षणिक अर्हता , वय तसेच किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचा अनुभव धारण केलेला असणे अनिवार्य आहे.

१.४ समांतर आरक्षणांतर्गत महिला , माजी सैनिक , अंशकालीन कर्मचारी , खेळाडू, प्रकल्पग्रस्त, विकलांग व्यक्ती, अनाथ मुले इ. यांचेसाठी आरक्षित असलेली पदे ही त्या त्या प्रवर्गातील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. उर्वरीत पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षणा व्यतिरिक्त आहेत. तसेच समांतर आरक्षणबाबत शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/ प्र.क्र.१६/१२/१६अ दिनांक १३ ऑगस्ट , २०१४ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१.५ विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करतांना उमेदवार कोणत्या समाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या उपलब्ध सामाजिक प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

१.६ ज्या उमेदवारांनी सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/प्रकल्प अधिकारी , आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड ई. कार्यालयांमध्ये नावे नोंदविलेली आहेत. त्याचप्रमाणे ज्या उमेदवारांची सदर पदासाठी सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेली आहे , अशा उमेदवारांनीही या पदासाठीच्या संगणक आधारीत (Computer Based Exam) ऑनलाईन परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच परिक्षेसाठीचे विहीत शुल्क भरणे आवश्यक राहील.

१.७ विहीत अहर्ता प्राप्त शासकिय/निमशासकिय/शासकिय उपक्रम तथा महामंडळाचे कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सक्षम प्राधिका-यामार्फत पुर्व परवानगीने भरावेत.

१.८ पदभरतीसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यात येतील. ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाचे प्रिंट तसेच कोणतेही प्रमाणपत्र पाठवू नयेत मात्र अर्जदाराने अर्जाचे प्रिंट तसेच परीक्षा शुल्क भरल्याची पावती काळजीपूर्वक जतन करणे आवश्यक आहे.

१.९ उमेदवाराला कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या केंद्रावरून अर्ज भरता येईल.

२) उपरोक्त विज्ञापित पदांकरिता निर्धारीत वेतनश्रेणी, परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन, आवश्यक शैक्षणिक, तांत्रिक अर्हता, अनुभव, अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहील.

| पद क्रमांक | पदाचे नाव, वेतनश्रेणी व परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन | किमान शैक्षणिक अहर्ता, अनुभव |
|---|---|---|
| ०१ | जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२ / क्षेत्र अधिकारी<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्थेची बी.एस.सी. (कृषि) पदवी उत्तीर्ण. मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्थेची एम.एस.सी. (कृषि) ही पदव्युत्तर पदवी ॲग्रीकल्चर बॉटनी, ॲग्रोनॉमी, जेनेटिक्स, प्लॅन्ट ब्रिडींग आणि सिड टेक्नोलॉजी मध्ये स्पेशलायझेशन असल्यास प्राधान्य.<br>किमान शैक्षणिक अहर्ता बी.एस.सी.(कृषि) पदवी उत्तीर्ण केल्यानंतर कमीतकमी ३ वर्षे सीड इंडस्ट्री तथा तत्सम क्षेत्रातील अनुभव आवश्यक किंवा कृषि पदव्युत्तर एम.एस.सी.(कृषि) पदवी उत्तीर्ण असल्यास १ वर्षाचा सीड इंडस्ट्री तथा तत्सम क्षेत्रातील अनुभव आवश्यक. |
| ०२ | कनिष्ठ केंद्र अभियंता<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/-प्रतिमाह** | मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्था/अभियांत्रीकी संस्थेची बी.टेक.(कृषि अभियांत्रीकी) पदवी उत्तीर्ण. मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्था/अभियांत्रीकी संस्थेची एम.टेक.(प्रोसेसिंग इंजिनिअरींग) ही पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य. |
| ०३ | लेखापाल/अंतर्गत अंकेक्षक<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील एम.कॉम. ही पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर शासकिय/निमशासकिय/चांगल्या वाणिज्यिक मंडळ/ संस्थेमध्ये लेखाविषयक पुस्तके हाताळण्याचा तसेच लेखे अंतिम करण्याबाबतच्या कामाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव.<br>(चांगल्या वाणिज्यीक संस्था म्हणजे ज्या संस्थेची वार्षिक उलाढाल ही रू.१० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. तसेच सी.ए.फर्म असल्यास वार्षिक प्राप्ती ही रू.१० लाख किंवा त्यापेक्षा जास्त)<br>किंवा सी.ए./आयसीडब्ल्युए उत्तीर्ण असल्यास प्राधान्य |
| ०४ | व्यवस्थापकीय संचालक यांचे स्विय सहायक<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ /महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ६० श.प्र.मि. सोबतच मराठी लघुलेखन व टंकलेखन अहर्ता धारकास तसेच खाजगी सचिव अभ्यासक्रमातील पदविका धारकास प्राधान्य.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर शासकिय/ निमशासकिय/ व्यावसायीक संस्थेमध्ये स्विय सहायक या पदावर काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| पद क्रमांक | पदाचे नाव, वेतनश्रेणी व परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन | किमान शैक्षणिक अहर्ता, अनुभव |
|---|---|---|
| ०५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br><br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेची/मंडळाची सिव्हिल इंजिनिअरिंग मध्ये बी.ई.(सिव्हिल) पदवी/पदविका (सिव्हिल डिप्लोमा).<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर स्थापत्य विषयक/ बांधकाम विषयक किमान ३ वर्षाचा अनुभव. ज्यामध्ये २-३ स्टोरेज बिल्डिंग, इंडस्ट्रियल शेड प्लान्स, रस्ते आणि संरचना यासारखी कामे समाविष्ट आहेत. |
| ०६ | कनिष्ठ अभियंता (विद्युत)<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४४०० **(गट-ब)**<br><br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.३०,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठ /संस्थेची / मंडळाची ईलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग मध्ये बी.ई. (ईलेक्ट्रिकल) पदवी / पदविका(ईलेक्ट्रिकल डिप्लोमा).<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर वेअर हाऊस तसेच इमारतीमध्ये उच्च दाबाच्या ईलेक्ट्रिकल मशीनरींचे इंस्टॉलेशन करण्याचा कमीतकमी ३ वर्षाचा अनुभव सोबतच ईलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अतिरिक्त अनुभव धारकांना प्राधान्य. |
| ०७ | लघुलेखक (निम्न श्रेणी) इंग्रजी<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४३०० **(गट-ब)**<br><br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२८,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ/महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि. उत्तीर्ण. तसेच मराठी लघुलेखन व टंकलेखन प्रमाणपत्र धारकांना प्राधान्य.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर चांगल्या वाणिज्यिक मंडळ/ संस्थेमध्ये लघुलेखक म्हणून काम केल्याचा तथा तत्सम प्रकारचे कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा. |
| ०८ | लघुलेखक (निम्न श्रेणी) मराठी<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४३०० **(गट-ब)**<br><br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२८,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ/महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची मराठी लघुलेखन ८० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि. उत्तीर्ण. तसेच इंग्रजी लघुलेखन व टंकलेखन प्रमाणपत्र धारकांना प्राधान्य.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर चांगल्या वाणिज्यिक मंडळ/संस्थेमध्ये लघुलेखक म्हणून काम केल्याचा तथा तत्सम प्रकारचे कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा. |

| पद क्रमांक | पदाचे नाव, वेतनश्रेणी व परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन | किमान शैक्षणिक अहर्ता, अनुभव |
|---|---|---|
| ०९ | कनिष्ठ पैदासकार<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४३०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२८,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्थेची एम.एस.सी.(कृषि) ही पदव्युत्तर पदवी , ॲग्रिकल्चर बॉटनी , जेनेटीक्स व प्लांट ब्रिडींग मध्ये स्पेशलायझेशन असावे.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर संशोधन व विकासाचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य. |
| १० | सहायक क्षेत्र अधिकारी<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४३०० **(गट-ब)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२८,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठ/कृषि संस्थेची बी.एस.सी.(कृषि) पदवी.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर सीड इन्डस्ट्रीमध्ये काम करण्याचा अनुभव असणा-या उमेदवारांना प्राधान्य. |
| ११ | आरेखक<br>पीबी-२ रू.९३००-३४८००<br>ग्रेडवेतन रू.४२०० **(गट-क)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२८,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त संस्था/मंडळाची स्थापत्य अभियांत्रीकी पदविका (Diploma in Civil Engineering).<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर संगणकाधारीत डिझाइनींग/ड्रॉईंगसॉफ्टवेअर जसे ऑटोकॅड इ.क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| १२ | माळी<br>पीबी-१ रू.५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रू.२४०० **(गट-क)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२०,०००/- प्रतिमाह** | एस.एस.सी. व मान्यताप्राप्त विद्यापीठ/शेतकी शाळेचा माळी प्रशिक्षण पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर माळी विषयक कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| १३ | लिपीक-टंकलेखक<br>पीबी-१ रू.५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रू.२४०० **(गट-क)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२०,०००/-प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ/ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर शासकिय/ निमशासकिय/चांगल्या वाणीज्यिक संस्थेमध्ये लिपीक/कनिष्ठ लिपीक पदावरील किमान २ वर्षाचा अनुभव.<br>(चांगली वाणीज्यिक संस्था म्हणजे किमान रू.१० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वार्षिक आर्थिक उलाढाल असलेली संस्था) |
| १४ | प्रयोगशाळा सहायक<br>पीबी-१ रू.५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रू.२४०० **(गट-क)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.२०,०००/- प्रतिमाह** | एस.एस.सी.(इयत्ता १० वी) उत्तीर्ण/एच.एस.सी.(इयत्ता १२ वी) उत्तीर्ण व मान्यताप्राप्त शेतकी शाळेचा कृषि पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर संबधीत क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| १५ | कनिष्ठ लिपीक-टंकलेखक<br>पीबी-१ रू.५२००-२०२००<br>ग्रेडवेतन रू.१९०० **(गट-क)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.१९,०००/- प्रतिमाह** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ/ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण. |

| पद क्रमांक | पदाचे नाव, वेतनश्रेणी व परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन | किमान शैक्षणिक अहर्ता, अनुभव |
|---|---|---|
| १६ | कनिष्ठ प्रक्रिया सहायक<br>-एस १ रू.४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रू.१६०० **(गट-ड)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.१६,०००/- प्रतिमाह** | एस.एस.सी. (इयत्ता १० वी) उत्तीर्ण तसेच मान्यताप्राप्त शेतकी शाळेचा कृषि पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br><br>किमान शैक्षणिक अहर्ता धारण केल्यानंतर सीड इन्डस्ट्री तसेच तत्सम इन्डस्ट्रीमध्ये काम केल्याचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव. |
| १७ | कनिष्ठ ऑपरेटर<br>-एस १ रू.४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रू.१६०० **(गट-ड)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.१६,०००/- प्रतिमाह** | एस.एस.सी.(इयत्ता १० वी) उत्तीर्ण तसेच शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (I.T.I.) इलेक्ट्रिक ट्रेड अभ्याक्रम उत्तीर्ण.<br>म.रा.बियाणे महामंडळामध्ये एक वर्ष रोजंदारीवर समाधानकारक काम केल्याचा अनुभव किंवा सीड/ग्रेन/स्टॅन्डर्ड मॅन्युफॅक्चरींग इन्डस्ट्रीमध्ये १ वर्ष काम केल्याचा अनुभव. |
| १८ | शिपाई/पहारेकरी<br>-एस १ रू.४४४०-७४४०<br>ग्रेडवेतन रू.१३०० **(गट-ड)**<br>**परिविक्षाधीन कालावधीमध्ये मिळणारे एकमुस्त वेतन रू.१४,०००/- प्रतिमाह** | कमीत कमी १० वी उत्तीर्ण |

टिप:- पदासाठी आवश्यक असलेला अनुभव हा पदासाठीची किमान शैक्षकि अहर्ता धारण केल्यानंतरच्या कालावधीचा असणे अनिवार्य आहे. किमान शैक्षणिक अहर्ता धारण करण्यापूर्वीच्या कालावधीचा अनुभव विचारात घेतल्या जाणार नाही.

**३) वयोमर्यादा:-**

३.१ जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक १०.०५.२०१८ रोजी** गणले जाईल.

३.२ खुल्या प्रवर्गातील (सर्वसाधारण) उमेदवारांकरीता वय किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना विहीत कमाल वयोमर्यादा ५ वर्ष शिथिलक्षम असेल.

३.३ विकलांग व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, जनगणना/निवडणूक कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, खेळाडू, अंशकालीन उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथिलक्षम राहील. त्यानुसार विकलांग/ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/ सन १९९१ चे जनगणना कर्मचारी/ १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी/प्रकल्पग्रस्त यांचेसाठी ४५ वर्षे तर अंशकालीन उमेदवारांसाठी ४६ वर्षे कमाल वयोमर्यादा राहील. तसेच खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

३.४ सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ दिनांक २० ऑगस्ट, २०१० नुसार माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच विकलांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

३.५ महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामध्ये नियमित सेवेत कार्यरत कर्मचा-यासाठी वयोमर्यादा ही सदर उमेदवाराच्या महामंडळामध्ये झालेल्या सेवेच्या कालावधीइतकी शिथीलक्षम राहील तथापि, ही शिथीलक्षम

वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त असणार नाही. या शिवाय महामंडळातील कर्मचा-यासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षावरून ५० वर्षापर्यंत सुध्दा शिथीलक्षम राहील मात्र त्यासाठी संबंधीत कर्मचा-याचे ४५ वर्षानंतरच्या पुढील पाच वर्षाचे नजीकच्या कालावधीचे गोपनीय अहवाल हे अत्युत्कृष्ठ **A+(Outstanding)** असणे अनिवार्य राहील. ४५ वर्षे ते ५० वर्षे या कालावधीदरम्यान जेवढया वर्षासाठी वयोमर्यादा शिथीलक्षम राहील तेवढया वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ **A+(Outstanding)**असणे गरजेचे आहे.

**४) महिला समांतर आरक्षण:-**

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५/०५/२००१ नुसार खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति/कुटूंबातील(क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील विशेष मागास प्रवर्ग , इतर मागासवर्ग, विमुक्त जाती (अ) , भटक्या जमाती (ब) , भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**५) भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त समांतर आरक्षण:-**

भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आव श्यक राहील. सक्षम प्राधिका-यांकडून प्रमाणपत्र तपासणी अंती वैधता ग्राहय धरण्यात येईल.

**६) खेळाडू समांतर आरक्षण:-**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो- २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ३० एप्रिल, २००५ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये खेळाडूंसाठी ५ टक्के समांतर आरक्षण विहीत करण्यात आलेले आहे. यासाठी क्रीडाविषयक अहर्ता खालीलप्रमाणे असावी.

<u>अ) गट-ब साठी अहर्ता</u>

६.१ सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये महाराष्ट्रातर्फे प्रतिनिधीत्व करतांना राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेत प्रथम , व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. सदर स्पर्धा या संबंधीत खेळांच्या भारतीयऑलिम्पिक समितीशी सलंग्न असलेल्या राष्ट्रीय फेडरे शनने आयोजीत केलेल्या असाव्यात अथवा भारतीय ऑलिम्पिक समितीने स्वतः आयोजीत केलेल्या असाव्यात.

६.२ तसेच उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा या मान्यताप्राप्त खेळांच्या असून राष्ट्रीय स्तरावरील भारतीय ऑलिम्पिक समितीच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्यात. यामध्ये सहभागी होणा-या खेळांडूची निवड ही राज्य संघातून झालेली असावी.

<u>ब) गट-क व ड साठी अहर्ता</u>

६.३ सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण , रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

६.४ राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वतः आयोजीत केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

६.५ राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (एन.सी.सी.) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेले उमेदवार.

६.६ खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत गटातील व्यक्ति/कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग , विशेष मागास प्रवर्ग , विमुक्त जाती (अ) , भटक्या जमाती (ब) , भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

६.७ इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गट (क्रिमिलेअर) बाबत सामाजीक न्याय विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व अटी लागू राहतील.

**७) अंशकालीन समांतर आरक्षण:-**

सामान्य प्र शासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक- १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ अनुसार सु शिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयांमध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गद र्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अं शकालीन उमेदवारांना गट -क मधील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांमध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यानुसार अं शकालीन उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तिन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयामध्ये या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**८) विकलांग:-**

विकलांग या प्रवर्गातील उमेदवाराचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असुन निवड झालेल्या उमदेवारांना प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी संबंधीत जिल्हा शासकिय रूग्णालय अथवा प्राधिकृत केलेल्या वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**९) परीक्षा शुल्क:-**

९.१ सर्वसाधारण (खुला प्रवर्गातील) उमेदवारांकरीता रूपये ५००/- व मागासवर्गीयांसाठी रूपये २५०/- परीक्षा शुल्क राहील. परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

९.२ उमेदवार क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/एटीएम पिन/इंटरनेट बँकिंग/वॅलेट/कॅश कार्ड/आयएमपीएस द्वारे शुल्क भरणा करू शकतात.

अ. उमेदवार आपापल्या सोयीनुसार भरणा करू शकतात.
आ. भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.
इ. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करून भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.
ई. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणून संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

९.३ उमेदवारास एकापेक्षा अधिक किंवा जास्तीत जास्त ३ पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास एकाच लॉगिन मधून अर्ज सादर करता येईल. खालील नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक गटातून ( Group) उमेदवाराच्या अहर्तेनूसार कोणत्याही एका पदा करिता अर्ज करता येईल. जेवढ्या पदांकरिता अर्ज सादर करावयाचा आहे तेवढ्या पदांच्या परीक्षा शुल्काचा भरणा उमेदवारास करावा लागेल.

*(उदा.खुला प्रवर्गातील उमेदवारास त्याच्या पात्रतेनूसार त्याला ३ पदा करिता अर्ज करावयाचा झाल्यास त्यास रु.१५००/- इतक्या परीक्षा शुल्काचा भरणा करावा लागेल.)*

| **गट -१ (Group - 1)** | **गट – २ (Group - 2)** | **गट – ३ (Group - 3)** |
|---|---|---|
| जिल्हा व्यवस्थापक श्रेणी-२/ क्षेत्र अधिकारी | कनिष्ठ केंद्र अभियंता | सहायक क्षेत्र अधिकारी |
| लेखापाल / अंतर्गत अंकेक्षक | लघुलेखक (निम्न श्रेणी) इंग्रजी | लघुलेखक (निम्न श्रेणी) मराठी |
| व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहायक | आरेखक (Draghtsman) | कनिष्ठ लिपीक – टंकलेखक |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | लिपीक – टंकलेखक | माळी |
| कनिष्ठ अभियंता (विद्युत) | प्रयोगशाळा सहायक | – |
| कनिष्ठ प्रक्रिया सहायक | कनिष्ठ पैदासकार | – |
| कनिष्ठ ऑपरेटर | शिपाई/पहारेकरी | – |

१०) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना:-
अर्जामध्ये खालील टप्पे आहेत :

१. नोंदणी
२. अर्जावरील माहितीचे पूर्वावलोकन
३. ऑनलाईन शुल्क भरणा
४. अर्जाची प्रिंटआऊट

### १. कृपया अर्जासंबंधी खालील सूचना पहा

उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल.उमेदवाराने आपल्याउजव्याबाजूलाअसलेल्या -सूचना॰ यापर्यायावर क्लिक करावे.तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.

१. उमेदवाराचे नाव, वडिलांचे/पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.
२. छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती :
    अ. कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० पिक्सल असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करावे. छायाचित्राचे आकारमान २०केबी ते ५० केबीच्या दरम्यान असावा.
    आ. ५x४.५सेमीचा एक आयत काढा. त्या आयतामध्ये स्वाक्षरी करावी. ती प्रतिमा स्कॅन करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ केबी ते ५० केबीच्या दरम्यान असावे.

३. पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफीस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी.

४. त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दलमाहितीभरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपलाजात प्रवर्गनिवडावा .तसेचउमेदवारासत्याचाधर्म , नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र आणि उमेदवार हा सरकारी कर्मचारी आहे किंवा नाही याबद्दलची माहिती द्यावी लागेल .

५. ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. उमेदवाराकडे आधार क्रमांक नसल्यास त्याने/तिने आधार करिता नोंदणी करून त्यांचा आधार नोंदणी क्रमांक द्यावा.

६. उमेदवारांना अपंग आणि इतर आरक्षणांचा पर्याय पण दिलेला आहे.

७. **फक्तमहाराष्ट्रराज्याचेअधिवासप्रमाणपत्रअसलेलेउमेदवारअर्जकरण्यासपात्रआहेत**

८. शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. पदवी कोणत्या विद्यापिठातून घेतली, मिळालेले गुण, कमाल गुण, उत्तीर्ण झालेले वर्ष, विद्यापीठाचे नाव इ. माहितीसुद्धा भरण्यात यावी.त्यानुसार टक्केवारी काढली जाईल.

९. एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदारास **पुढे** या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदारांकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील **संपादित** करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१०. त्यानंतरचा अर्ज प्रत्येक विभागानुसार आवश्यक त्या माहिती नुसार भरून घेतला जाईल. उमेदवाराला त्यानुसार माहिती द्यावी लागेल.

११. पुढे जाण्यासाठी अर्जदाराला **परीक्षादाखवा** ऑप्शन वर क्लिक करावे लागेल. पुढे अर्जदाराने अर्ज करण्यासाठी तुम्ही पात्र असलेल्या पदाला निवडावे लागेल, त्यानंतर त्यास प्रोसिड या बटनावर क्लिक करावे लागेल. तुम्ही ग्रुप १,२,३ मधून एकयाप्रमाणे जास्तीतजास्त ३ पदांसाठी अर्ज करू शकता .

१२. जाहिराती मध्ये नमूद केल्या प्रमाणे पदविका / पदवी / पदुत्तर पदवी व्यावसायिक पात्रता असणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत .

१३. उमेदवार नोंदणी अर्जामध्ये दिल्या प्रमाणे तीन परीक्षा केंद्राचा प्राधान्यक्रम निवडू शकतो.

१४. ह्यानंतर उमेदवाराने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ऑनलाइन शुल्क भरावे.

१५. उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शवण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे.

१६. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा **सबमिट** हा पर्याय उपलब्ध होईल.

१७. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

**२. अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:**

अ. युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

आ. अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्ह्यू" या पर्यायावर क्लिक करा.

३. **ऑनलाईन भरणा:**

उमेदवार क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/एटीएम पिन/इंटरनेट बँकिंग/वॅलेट/कॅश कार्ड/आयएमपीएस द्वारे शुल्क भरणा करू शकतात.

उ. उमेदवार आपापल्या सोयीनुसार भरणा करू शकतात.

ऊ. भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.

ऋ. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करून भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.

ऌ. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणून संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

४. **अर्जाची प्रिंट**

अ. उमेदवाराने अर्जाची एक प्रत आपल्याकडे ठेवावी.

आ. अर्ज संबंधित विभागाकडेजमा करण्याची आवश्यकता नाही.

**महत्वाचे:**

**"जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट , परीक्षेत उपस्थिती , गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियां साठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यातआली असेल तर कृपया याविषयांबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्रीनंबर १८०० ३००० ७७६६ वर कॉल करा."**

**"नोंद : नोंदणी मधील तपशील जसेकी वापरकर्ता नाव, ईमेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान, जन्मतारीख इत्यादि फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणारनाही."**

११) संगणक आधारीत ऑनलाईन परीक्षा (Computer Based Online Exam.)/मुलाखती अंती गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना पडताळणीसाठी खालील मूळ प्रमाणपत्रे व स्वसाक्षांकीत (Self Attested) छायाप्रती सादर करावे लागतील:-

११.१ शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधीत बोर्ड/विद्यापीठ/संस्थेचे प्रमाणपत्र.

११.२ लागू आहे त्या पदांबाबतीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद/ शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील टंकलेखन/लघुलेखन अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे.

११.३ जन्मतारखे बाबतच्या पुराव्या दाखल १० वी उत्तीर्ण केल्याबाबत बोर्डाचे प्रमाणपत्र.

११.४ पदासाठी आव श्यक असलेला तसेच पदाची किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरच्या कालावधीचा अनुभव असलेले प्रमाणपत्र.

११.५ सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

११.६ महाराष्ट्र राज्याचा रहिवा सी असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (Domicile Certificate).

११.७ प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.

११.८ लागू असल्यास सक्षम प्राधिका-याने दिलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
११.९ विकलांग व्यक्तिंचे बाबतीत जिल्हा शासकिय रूग्णालयाचे अथवा वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र.
११.१० ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट व परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत.
११.११ माजी सैनिक उमेदवाराने सशस्त्र दलात केलेल्या सेवेबाबतचे प्रमाणपत्र
११.१२ अंशकालीन उमेदवारांनी सु शिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व या अनुभवाची नोंद घेतल्याबाबत सेवायोजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र.
११.१३ खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरीता सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.
११.१४ इतर अनुषंगीक आवश्यक प्रमाणपत्रे.
११.१५ खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबा बाबतचे प्रमाणपत्र.

*महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम२००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ*

<u>प्रतिज्ञापत्र नमुना-अ (नियम४ पहा)</u>

मी श्री/श्रीमती/कुमारी............................................................................... श्री .............................. ............................... यांचा मुलगा/यांची मुलगी/यांची पत्नी वय ............. वर्ष, राहणार ...................................... याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ........................................................ या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.
२) आज रोजी मला .................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी२८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ..................... आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)
३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक२८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण .......................... उमेदवाराची सही
दिनांक ....../......./२०१८ (उमेदवाराचे नाव ............................)

१२) पदनिहाय निवडीची पध्दत पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदाचे नांव | निवडीची पध्दत | तपशील |
|---|---|---|---|
